**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये निदेश...**

राज्यातील नियोजन प्राधिकरणांच्या विकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट करण्यात आलेल्या हस्तांतरणीय विकास हक्क नियमावलीतील रस्ता विकसनाचे विनियमा बाबतचे स्पष्टीकरण...

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-३२**
**दिनांक :२३/०४/२०१८**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६**

**क्र.टिपीएस-१८१७/व्हिआयपी/२१३/प्र.क्र.११६/१८/नवि-१३:-** ज्याअर्थी, शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१)(क क)(ग) मधील तरतूदींनुसार (यापुढे जिचा उल्लेख उक्त अधिनियम असा करण्यात आलेला आहे) राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका सोडून इतर सर्व महानगरपालिका / सर्व नगरपालिका (यापुढे जिचा उल्लेख उक्त नियोजन प्राधिकरण असा करण्यात आलेला आहे) यांच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये **विकास हक्क हस्तांतरणाचे** सुधारीत विनियमास शासन अधिसूचना क्र.टिपीएस-१८१३/३०६७/प्र.क्र.१२२/१२/मनपा/नवि-१३, दि.२८/०१/२०१६ व समक्रमांकाची अधिसूचना दि.२९/०१/२०१६ तसेच नगरपालिकांसाठी दि.०६/०२/२०१६ च्या अधिसूचनेद्वारे अंतिम मंजूरी दिलेली आहे. (यापुढे जिचा उल्लेख उक्त अधिसूचना असा करण्यात आलेला आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेद्वारे मंजूर केलेल्या विकास हक्क हस्तांतरणाच्या विनियमामधील काही सुधारणांबाबत शासनाने पूरक पत्र क्र.टिपीएस-१८१३/३०६७/प्र.क्र.१२२/१२/मनपा/नवि-१३, दि.०२/०५/२०१६ व दि.०७/०५/२०१६ अन्वये निर्गमित केले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास हक्क हस्तांतरणाचे विनियमामधील काही नियमांचे स्पष्टीकरण करण्याबाबत काही नियोजन प्राधिकरणानी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने शासनाने उक्त अधिनियमाच्या कलम-१५४ अन्वये दि.२६/१२/२०१६ रोजी निदेश निर्गमित केलेले आहेत;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास हक्क हस्तांतरणाचे विनियमामधील तरतूद क्र.४.२ नुसार विकास योजना रस्ता संबंधित जमीनीचा मालक / भाडेपट्टादार विकसीत करुन देत असल्यास त्याबाबत वार्षिक बाजारमुल्यदर तक्त्यात या स्वरुपाचे बांधकामाचा दर नमूद नसल्याने त्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या DSR मधील दराचा आधार घेवुन रस्त्याचे बांधकाम वैशिष्ट्यानुसार बांधकामाचा खर्च निश्चित करणे बाबत सूचना देणे आवश्यक असल्याचे शासनाचे मत झाले आहे;

त्याअर्थी, शासनाने निर्गमित केलेल्या उक्त अधिसूचनेसोबतच्या विकास हक्क हस्तांतरणाच्या विनियमातील तरतूद क्र.४.२ अनुषंगाने खालील प्रमाणे उक्त नियोजन प्राधिकरणांनी कार्यवाही करणेबाबत उक्त अधिनियमाचे **कलम १५४** अन्वये खालील प्रमाणे निदेश देण्यात येत आहेत:-



URBAN DEVELOPMENT DEPTT. सत्यमेव जयते MANTRALAYA, MUMBAI 32

| मुद्दा | शासनाचे स्पष्टीकरण |
|---|---|
| हस्तांतरणीय विकास हक्का बाबतच्या विनियमातील तरतूद क्र.४.२ अन्वये विकास योजना रस्ता संबंधित जमीनीचा मालक / भाडेपट्टादार विकसीत करुन त्याखालील जमीनींसह हस्तांतरीत करीत असल्यास वार्षिक बाजारमुल्य दर तक्त्यात रस्ते विकसनाचा दर नमूद नसल्याने कोणता दर विचारात घेवून कार्यवाही करावी. | अशा स्वरुपाच्या रस्ते विकसनाच्या प्रकरणात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या DSR मधील दराचा आधार घेवुन रस्त्याचे बांधकाम वैशिष्ट्यानुसार रस्ता विकसनाचा खर्च निश्चित करुन एकुण बांधकामाची किंमत संबंधित नियोजन प्राधिकरणाचे आयुक्त / मुख्याधिकारी यांनी निश्चित करुन पुढील कार्यवाही करावी. |

सदरहू निदेश शासनाच्या www.maharashtra.gov.in (**कायदे / नियम**) या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

URBAN DEVELOPMENT DEPTT. सत्यमेव जयते MANTRALAYA, MUMBAI 32

(रा.म.पवार)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१) मा.मुख्यमंत्री महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.राज्यमंत्री, (नगर विकास) महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) प्रधान सचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रति,

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) संचालक, नगर रचना तथा सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) सह संचालक, नगर रचना तथा सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) आयुक्त, महानगरपालिका (सर्व).
५) सह संचालक, नगर रचना, नागपूर, अमरावती, औरंगाबाद, नाशिक, पुणे व कोकण विभाग.
६) सहायक संचालक, नगर रचना, / नगर रचनाकार, शाखा कार्यालय (सर्व).
७) मुख्याधिकारी, नगरपरिषद (सर्व).
८) कक्ष अधिकारी (नवि-२९) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई. -/ त्यांना विनंती करण्यात येते की, सदरचे शासन निदेश या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावेत.
९) कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई - त्यांना विनंती करण्यात येते की, सदरचे शासन निदेश शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावेत.
१०) निवड नस्ती (कार्यासन-१३).

*******

D:\Pune Desk\Policy Matters\Nidesh.docx